# सुंदरा



पंढरीनाथ रेडक

REFBK-0018847
REFBK-0018847
१९८३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २९९८

संदर्भ /काव्य
८००६९ / ५/३/८३
२११८

१९८३



# सुंदरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९५५०
८००३६९ काव्य
२११६ ८।३।७३
REFBK-0018847



क्विक प्रिंट आर्टस् प्रकाशन, मुंबई १६.

# सुंदरा

पंढरीनाथ रेडकर

# मायतात तीर्थ जिथे !

प्रकाशक :

श्री. एकनाथ प्रभुलकर

श्री. भालचंद्र निगुडकर

≈ ≈ ≈

मुखपृष्ठ [ आर्टकॉर्नर ]

मुंबई ४

≈ ≈ ≈

प्रथमावृत्ती : १ जानेवारी १९७३

≈ ≈ ≈

किंमत चार रुपये

≈ ≈ ≈

मुद्रक :

क्विक मुद्रणालय,

१२१/अलाईड इंडस्ट्रियल इस्टेट,

माहिम, मुंबई १६.

हटकरी प्रिंटिंग प्रेस मुंबई २८.

≈ ≈ ≈

(c) सौ. कालिंदी पंढरीनाथ रेडकर

३३/५९९, आदर्श नगर.

वरळी, मुंबई २५.

# आशीर्वाद

**पंढरीनाथ रेडकर** यांचा हा पहिलाच कवितासंग्रह. सर्वसाधारणपणे प्रत्येक कवीच्या काव्यरचनेत प्रीतीगीतांचा भरणा अर्थातच जसा मोठा असतो तसाच तो त्यांच्या रचनेतही आहे. इतकेच नव्हे तर त्यांची प्रेमगीते चांगलीच रंगेल आणि रंगेल आहेत. प्रकृतिधर्माने ती लावणी-काव्याला अधिक जवळची आहेत. तशीच राकट आणि रानवट. पण आधुनिक कवितेतली सूचकता, सूक्ष्मता आणि नाजूकपणाही त्यांना वर्ज्य नाही, तसाच नवकाव्याचा नवा आकृतिबंधही त्यांनी आपलासा केला आहे. लावण्या, अभंग, लोकगीते ह्या रचनापद्धतींचा त्यांचा अभ्यास तर चांगला आहेच, पण आजची कविताही त्यांना चांगली अवगत आहे. ह्या सर्व परंपरांमधून त्यांनी जे जे सुंदर, मोहक, मधुर आणि मुलायम ते ते आवडीने उचलले आहे आणि त्यांच्या ह्या कवितासंग्रहाचे 'सुंदरा' हे नावच त्यांच्या अंतरंगाची कल्पना देऊन जात आहे खास.

'सुंदरा' ह्या कवितासंग्रहाचं हस्तलिखित चाळत असताना त्यातल्या सर्व कविता मी बारकाईनं वाचून पाहिल्या. काही आवडल्या, कांहींचा प्रभाव पडला. काही सर्वसामान्य वाटल्या. एवढे मात्र वाटले की, रेडकरांच्या रचनेत काही दोष आहेतच विशेषतः त्यांच्या छंदोबद्ध कवितेला अजून पुष्कळच वळणावर यायचं आहे. नवे आकृतिबंधही आशयातून सहजपणे उत्स्फूर्त झालेले नाहीत. काही नवकवींच्या रचनेने प्रभावित होऊन बऱ्याचशा कविता केल्यासारख्या वाटतात. पण ह्या काही उणिवा वगळता इतके मात्र जाणवले की रेडकरांची कविता अतिशय उत्कट आहे. काव्यासाठी वेडे आणि बेभान होण्याची ताकद त्यांच्यात आहे. त्यांच्या कवितांतल्या चांगल्या कविता कोणत्या असे जर कुणी मला विचारले तर मी त्यांच्या काही नादमधुर आणि स्वप्नधुंद अशा प्रेमगीतांकडे बोट दाखवीन.

'नार' ह्या कवितेचा तद्दन ढंग लावणीचा आहे. 'चंद्रा चवथीची' असं गोड विशेषण त्यांनी प्रियेला उद्देशून वापरलं आहे. 'कृपा मल्हाराची' असं त्यांनी ह्या 'नारी' ला म्हटलं आहे. मल्हाराची कृपा असल्यागतच त्यांची कविताही शृंगारसाच्या वेगवेगळ्या छटांचा वर्षाव करीत आहे.

'कालिंदी', रात्र अशी कां झाली? ह्या सारख्या काही कवितांतून भावनाविष्कार करताना त्यांची कविता अतीव हळुवार बनते. प्रणयातला एरवीचा बेबंदपणाही इथल्या अविष्कारात काहीसा विनम्र आणि संयत बनतो:

कलिका तू अंगणीं
जाई जुई पैंजणी
संध्येची तूच नशा
शुक्राची चांदणी

अशा फिकट धूसर छटांनी ते आपल्या प्रेमाचे चित्र रंगवतात.

दूर तुम्ही कां होता किंवा 'तू माझी रतन' ह्या सारख्या कवितांतून विद्ध प्रीतीचे सुस्कारे आणि उसासे ऐकावयास मिळतात. पण तेही हळुवारपणेच ऐकलेले:

दूर तुम्ही कां होता
विजनांच्या दूर दूर
रात्रीच्या रात्री उभी
वाहुनिया अश्रूपूर

व्याकुळ अवस्थेतली आपली निराशाच गीतातून व्यक्त व्हावी पण तिनेही बेसूर होता कामा नये, अशी उदात्त भावना कवी बाळगतो.

नव्या कवितेतली उन्मुक्तता कधी कधी उन्मनस्कपणात कवीला मानवते आणि मग एका स्वैर आनंदात तो सहज उद्गारतो :

शब्दांचाच रथ करावासा वाटतो मला
तेव्हाच वाटतं शरीराचं विमान करावं

'तू एक ज्योत एक समई' ह्या कवितेतही आठवणी खूप दाटून आल्यानंतर कवीला एकदम उसळून खूप बोलावेसे वाटते, ती संवादोत्सुक मनःस्थिती व्यक्त झाली आहे :

**एकाच वेळी पाऊस पडतो**
**थंडगार वारा...थंड झरे थंड जमीन**

अशा वेळी : **त्या शंकराच्या देवळामागे**
**तू मला प्रथम भेटली होतीस.**

हे सारं कवीला आठवतं आणि तो एकदम भावनाभरानं म्हणतो :

**तू माझ्या हृदयाच्या सांदीकोपऱ्यांतली ज्योत आहेस**

'राघववेळ' ही एक कविताही अशीच बोलक्या मनाची एक बोलकी लकेर

**राघू आणि मैना**
**राघूवेळ आवडते त्यांना**
**राघववेळेतच राघू मैनेची करतो दैना**

कधी कधी कवीच्या कवितेचे हे नवे अविष्कार सहजसुंदर वाटतात पण ज्या ठिकाणी त्याची कविताही विचारप्रवण बनते तेथे हे नवे प्रयोग फसतात, कारण रेडकरांच्या कवितेची जात ही मुळात भावविवश धुंद-वेड्या गीताचीच त्यामुळे तिला विचारांचे ओझे पेलवत नाही. मग त्यांची कविता नुसतीच शाब्दिक व पोकळ होते (उदा. बासरी ही कविता) त्यांची कविता जेव्हां गीताला जवळ असते तेव्हां ती सजिव आणि नैसर्गिक वाटते, व कधी एखाद्या कवितेचा मुखडा ते एखाद्या चटकदार

गाण्याचाच करून जातात. उदा. साजणा रात गातसे प्रीत, कमळण होती मनात माझ्या, निळ्या निळ्या गगनांत निळी चांदणी पहावी, मी गातो माझी गाणी, ये अशी एकदां, झुंजूमुंजूच्या झांजर समयी, रात्र अशी कां झाली?

आतापर्यंत रेडकरांनी काव्याचा अभ्यास पुष्कळ केला आहे. निधिध्यास तर त्यांच्यापाशी आहेच, प्रयोगही पुष्कळ झाले, आता अनावश्यक ते सर्व तोडावे आणि आपल्या कवितेची जात ओळखावी. मृदुल शब्द, धुंद प्रणयभावना आणि सौष्ठवपूर्ण रचना हा समतोल त्यांनी सांभाळला तर ते नामांकित गीतकार होतील, हाच त्यांना प्रेमाचा आशीर्वाद.

सौ. शिरीष पै
शिवशक्ति वरळी मुंबई १८.




या सर्वांचा मी मनःपूर्वक कृतज्ञ आहे.

# मी

माझे प्रथम काव्यपुष्प रसिकजनांच्या चरणी अर्पण करताना मला असीम आनंद होत आहे.

'सुंदरा' या कविता संग्रहात मी ज्या कविता लिहिल्या, त्यातील बऱ्याचशा कविता विविध विषयांवर लिहिल्या गेल्या आहेत, मी जिथं जिथं भारला गेलो, जिथं जिथं ओढला गेलो, जिथं जिथं माझं प्रेय मला सापडलं, त्या त्या प्रसंगावर मी माझी कविता रंगविली. मग त्या कवितेची तोडमोड करणं फक्त मराठी रसिकांच्या मर्जीचाच जमाखर्च ठरेल!

पराकाष्ठेनं उभा केलेला उत्कट काव्याचा व मूलभूत जीवनमूल्यांचा हा एक कवनवृक्ष आहे. तो या भूमीत, मराठी मातीत रुजेल, डौलाने तरारेल, आणि कालांतराने फळभाराने लवेल कां? या प्रश्नांचं उत्तर आणि उत्तर सांगणारा प्रश्न कवितावेड्या आणि भाववेड्या रसिकांचाच नाही कां!

'सुंदरा'मधल्या काही कविता क्रमशः लोकसत्ता, मराठा, वसंत, माणूस यासारख्या ख्यातनाम वृत्तपत्रांतून, मासिकांतून प्रकाशित झाल्या आहेत. प्रस्तुत वृत्तपत्रांच्या, मासिकांच्या संपादकांचे ऋण मी सदैव शिरोधार्य समजतो.

सौ. शिरीष पै, ह्यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. वडील बहिणीच्या मायेनं मला कविता कशी करावी, आपल्याच कवितेशी कसं समरस व्हावं हे त्यांनी शिकवलं कारण या युगांत एवढं तोलामोलाचं मार्गदर्शन करणारी माणसं क्वचितच! सौ. शिरीषताईंचा मी आजन्म ऋणी आहे.

प्राध्यापक केशव मेश्राम, प्रकाशक भाऊ प्रभुलकर व भालचंद्र निगुडकर, वि. वा. हिरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य अनमोल आहे. त्यांचा मी कसा उतराई होऊ!

हेटकरी प्रिंटिंग प्रेसचे कार्यवाह प्रकाश सारंग व त्यांचे सहकारी यांच्याविषयीचं प्रेम अंतरात चिरंतन राहील

सन्माननीय रामकृष्ण के. धोटे. एम. ए. एल. एल. बी. यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन बहुमोल आहे.

३३।५९९ आदर्श नगर, मुंबई २५ पंढरीनाथ रेडकर

सांडली पायींची
बोलकीं नुपुरें
सजली गोपुरें
शब्दांचीच

रंगेल रंगेल
डोळ्यांतले थेंब
गाण्यासाठी थांब
माझ्या प्रिया !

# -: अनुक्रम :-

---


| | | | |
|---|---|---|---|
| कुंपणाचा पेला | १ | माझ्या उत्तर रात्री | १६ |
| मोतिबिंब | २ | —मी | १७ |
| कुंदकळ्या ओठांतून | ३ | थांब | १८ |
| पावसात | ४ | पहिली भेट | १९ |
| रंभा | ५ | आभाळ भरून आले | २० |
| तू माझी रतन | ६ | दावेदारी | २१ |
| भाव | ७ | जाणीव | २२ |
| —दिशाहीन मी | ८ | अबोली | २३ |
| धनगार गंध कांती | ९ | घुंगरू | २४ |
| अतृप्त | १० | प्रतिबिंबाची साक्ष | २५ |
| राघववेळ | ११ | जीवनपुस्तक | २६ |
| सारं तुझंच | १२ | लाटा — | २७ |
| लाज | १३ | ललना | २८ |
| गाठ | १४ | गाडी सुटेपर्यंत | २९ |
| सुरंगी | १५ | लगाम | ३० |

## अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| गातो माझी गाणी | ३१ | अजुनी रंगले ना | ५१ |
| पानचंची | ३२ | दृष्ट नका लावू | ५२ |
| मनकवडी | ३३ | आसावरी | ५३ |
| तुझा देव्हारा | ३४ | —शोज | ५४ |
| कृष्णकळा | ३५ | चित्रगुप्त | ५५ |
| चित्तचोर | ३६ | ओली आग | ५६ |
| वाटतं व्हावं | ३७ | सत्य | ५७ |
| ओलीचिंब माझी प्रीत | ३८ | कांतार | ५८ |
| अबलख वारु | ३९ | मागायचं होतं | ५९ |
| सबले (स्वतंत्रते !) | ४० | बासरी | ६० |
| रात्र अशी कां झाली | ४१ | स्मशानयात्रा | ६१ |
| पांखरांत राहू पाहे | ४२ | तू एक ज्योत एक समई | ६२ |
| कालिंदी | ४३ | चंद्र | ६३ |
| ओढ | ४४ | घुमटी | ६४ |
| विवस्त्र पांखरांना | ४५ | महासती | ६५ |
| कमळण | ४६ | वाजीव एकतारी | ६६ |
| हिशोब | ४७ | किटाळ | ६७ |
| मधुवंतीची गाणी | ४८ | ध्या लावून दारं | ६९ |
| —नार | ४९ | ग्रीष्म | ७० |
| आठवण | ५० | | |

# कुंपणाचा पेला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

कुंपणाचा पेला
हाताने हलला
तारांच्या बंधाने
गुपचूप बांधला
पावसाळी ऋतुराजा
टिपटिप बोलला
कुंपणाचा पेला
गालांत हसला

# मोतिबिंब

पावसाच्या थेंबांचे मोतिबिंब झेलता झेलता...
मी काहीसा सुखावलो...
अन्वर पाटलांचा पानमळा...
शेलाट्या निवर झालेल्या पानकेळी...
हुंकारतात...खुणावतात, काजळ घातलेल्या मासोळीसारख्या
पावसाचे मोतीबिंब झेलून खोपीत तसाच थरथरत राहिलो...
कोणीतरी खाकरतच म्हटलं...
भिजू देत...त्याचंच सारं तोच भिजवतोय...

कुंद्कळया ओठांतून

कुंद्कळया ओठांतून लपल्या कां श्रीहरी ?
कांतीवर नीलवर्ण अंबर हे भर्जरी
बासुरि तव वाजवि रे हांसू बघ हांसले
गीत स्वरें लाजुनि ये जणू ब्रह्म पहा साठलें
गाउनि मी अंगाई बोलवु कां काऊ चिऊ ?
मिटती ना पापण्या उंबरठ्या कां उभी राहू ?

# पावसात

मंद मंद धूप जळे
धुंद धुंद चांद रात
छंद छंद मंद हवा
लसलसती फुलवात—

नील रंगी कैफ हवा
थकलेली सांज रात
कैफात कैफ नवा
भिजू दे ग पावसात—

सुंसाट धाऊन वारू
परतून आला
लगाम लावोनी
शुक्रतारा मालवीला
जळांत मासोळी
हांसून बोलली
नांवेत रंभा
कितींनी भोगिली

# तू माझी रतन

कैक वर्षांचा पाऊस
तसाच कैक वर्षांपर्यंत
पडतच रहातो हसत हसत...
पण तू मात्र
पोखरून ठेवलेल्या
मनाचा कानोसा
घेशील तर शपथ...
पण कां ? काय गुन्हा माझा
अर्थ न कळाला होता ?
मग रहा आता
शोधुन न सापडणारा रस्ता धुंदित...

## भाव

मज नाही भय
जन्म घेणें जरी झालें
हवें तें रूप देई
तुझ्यासवें...

आंस एक मोठी
मनांत साठवी
देवा तुझें रूप
अंतरात...

दिशाहीन मी
दिशा सोडलेला दहाजणांनी नाडलेला
गृहहीन मी
गृहधनिणीने फाडलेला अन दारातून दरडावलेला
दिवाणा झालेला, दमात दम भरलेला
द्वारकेचा कृष्ण मी, दादांना (?) दबलेला !

घनगार गंध कांती
मंद मंद हळू चाले
स्पंदनात तुझ्या भासे
यौवनाचा भार हाले

भगभगे वर खाली
झोप घेई सुखे सुखे
जिरली ना मस्ती तुझी
प्रश्नचिन्ह उभे सखे

# अतृप्त

आणि त्यामुळेच माझ्या आशाआकांक्षा मात्र अतृप्तच राहिल्या
कुणि कधी विचारच केला नाही
मी हसतो आहे...मी गातो आहे
मी रडतो आहे...तकलादू सारं
समजून उपेक्षिला गेलो
आणि त्यामुळेच माझ्या आशाआकांक्षा मात्र अतृप्तच राहिल्या
मेघनाद करणाऱ्या चंदेरी किनारीच्या
ढगानं सात्वन करायचं ठरवलं
पण तोच गडगडून आला
आणि कोसळला माझ्या कपाळावर
वाटलं आंघोळ घालतोय मला
एक म्हणाला : आंघोळ कसली? मुततोय साला !
फसवलं त्याने मला अक्षरशः
आणि त्यामुळेच माझ्या आशाआकांक्षा मात्र अतृप्तच राहून गेल्या
शिगा चोरतायत जरतारी साड्या नेसलेल्या बाया
कसला तरी आवाज पण येतोय तितळ नितळ
नारळाची खिरापत व्हावी तशी शिगाखाली
चेंगरून गेलीयत निष्पाप बाळं
आणि त्यामुळेच माझ्या आशाआकांक्षा मात्र अतृप्तच राहून गेल्या

राघू आणि मैना
राघव वेळ आवडते त्यांना
राघव वेळेतच राघू मैनेची करतो दैना

# सारं तुझंच

तुझेच रंग घेऊन तुलाच रंगवावं
तुझेच पंख लावुन तुलाच उडवावं
तुझंच पाणी घेऊन तुलाच शिंपावं
तुझंच हास्य चोरून तुलाच हसवावं
तुझंच सारं घेऊन तुलाच खूष करावं

# लाज

आली पुनव वैशाखीची
सांगावा आलाया
मोठी जरब भरताराची
सजणा तुला कळंना कसं रे...
जत्रेत जाताना वाटते लाज रे...

## गाठ

हाताने बांधते मी परकरी गाठ
बेंबी कस्तुरी सुगंध सैल होय नीरगाठ

कंचुकी मी आवळू कितीक
दोन्ही बाजूंस माझ्या निळारंग सारखाच

पोटच्या शिणल्या मस्तीने रातीच्या
वाट पहाता थकल्या हक्काच्या स्वारीच्या

## सुरंगी

तुझ्या वेणीचा सौरभ
धुंद झाले अंतराळ
लाजरा तुझा ओठ
दुसरा दुमडला पाठोपाठ...

केसात सुरंगी
बटा पापण्यांत आल्या
डोळ्यांत घाबरा भाव
पण नसल्याचा आव...

काळ्या घनांत
धावली बिजली
सोसाट्याचा वारा
त्याने कंचुकी फाटली...

तुझ्या कांतीचा मत्त गंध
रानोमाळ गेला
पहाटेचा वारा
कुर्वाळी क्षितिजाला ...

# माझ्या उत्तर रात्रीं

माझ्या उत्तर रात्रीं
चंद्रफुलांची लावुन पणती
विदेह होता मीपण माझें
थडगे माझें करील गणती

कविता माझ्या गाणीं माझीं
घरही माझें स्मशान माझें
राख फुलांची होऊन कविता
पुनवचांदणें मजला हसतां

उत्तर रात्रीं येतां जातां
थडगें माझी गाईल कविता

# मी

तू जातेस तेव्हा मी येतो
तू येतेस तेव्हा मी जातो
मी रुसतो तेव्हा तू गातेस
तू हसतेस तेव्हा मी रडतो...

तुटत्या उल्कांच्या
करुन लगोऱ्या
सुहाग रातीत
वाजवू बासुऱ्या
लाजऱ्या गाली खुळा
केशर थापु या
थोपवू रातीला
थांब हांसत राहु या...

आठवते कां पहिली भेट ?
नजाकतीची पहिली ऐट
आठवते कां पहिली भेट ?
नव्हता मोडला चमेली ओठ
आठवते कां पहिली भेट ?
आवळले होते ओठांत ओठ
आठवते कां पहिली भेट ?
फुलांत फिरला खट्याळ देठ
आठवते कां पहिली भेट ?
धुंद शराबी थांबवी लोट

# आभाळ भरून आलें

आभाळ भरून आलें
तसे डोळ्यांत अश्रू पण भरून
रस्त्यावरच्या कातोड्यांना
रस्ताच दिलासा देतो त्यानांच अनुसरून
पायाखालची वाट
व्यथा तुडवित जाते
डोळ्यांच्या खाचा झाल्या
किती वाहतील या पाण्याचे हो पाट ?
किती करावी रे गाणी ?
किती आणावे डोळ्यांत पाणी ?
माणसाला मसणांत नेणारी
ही माणसं होतील कां कधि शहाणी ?

# दावेदारी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८७६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

अरे जीवनात काय केलेस ?
लोकांशी दावेदारी !
नाही हसलास पारिजातकाच्या फुलासारखा
गायिलास मात्र नको ते वेड्या भाटासारखा
जीवनात केलीस लोकांशी दावेदारी
लक्षात ठेव हातात येईल
तार तुटलेली एकतारी

## जाणीव

मुकी संध्याकाळ ओली
नभ अलभ्य ताऱ्यांचे
महाशून्य शोभे मोठें
गाथलेले ओठ तुझे
निळी चांदणी ओलेती
चंद्रे ! ओठात कलती
माथा गिळतो उणीव
तुझी तुझ्यांयत जाणीव !

# अबोली

कलावंतीण ही कोण ?
उभी दारात ठेक्यात
शिणगार केला मोठा
गाते आपुल्या डौलात
रंगविला विडा
कात सुपारी तोंडात
तावदान उघडून
करी प्रीतीची बरसात
उघडले वक्ष दोन्ही
हालवित साथ साथ
कटिवर वळसुनी
येण्या अलगद दोन हात
कुंकवाची चिरी
लावी आरसा पहात
आपुल्या सजणाचे
रूप पाहे पैंजणांत
भाविण नव्हे ही हो
अबोली परसात
नागचाफा उभा मोठा
कुंपणाच्या आडोशात

## घुंगरु

एक स्वप्न पडलं मला नटरंगी
कित्ती मनासारखं ! मोहविणारं
मोहविताच जिवंत स्मृति वेडावल्या
वेड लावून हळूच गालातच हिर्वेळल्या
हिर्वेळणं, मृदु लालित्यपूर्ण भरोसा ठेवण्यासारखं
पायात एक घुंगरु लाखमोलाचं
मोलाचं अन हव्याहव्याशा वाटणाऱ्या तोलाचं
तोल गेला खोल जळांत जळातच ठेवून पैंजण वाजवले छुम..छुम..छुम..
टिपरी, मृदुंग, सतार, गिटार
गिटारीसोबत माझे हिरवे ओठ
ओठांतून बिलगले तुझ्या हरवलेल्या स्वप्नांत...

# प्रतिबिंबाची साक्ष

१००६१ काव्य
२११५ ९३|५

तुझ्या डोळ्यांत
पाहिलं मानवतेचं दुःख
तू पिकविलेल्या मळ्यांत
पाहिलं मी मीतभाषी सौख्य
तुझ्या कृष्णकांतीवर माझ्या मनाची
मोरनी नाचली
····अन्····
तिने दाखविलं मला
तुझं स्वररंगी हास्य
शेवटी तुझ्यात मी पाहिली
तुझ्या प्रतिबिंबाची साक्ष.

## जीवनपुस्तक

ज्या कोणाचें नांव जीवनाच्या पुस्तकांत सापडणार नाही
तो अग्नीच्या सरोवरात टाकला जाईल, भडाग्नी दिला जाईल.
अग्नीचें सरोवर हें दुसरें मरण ! नाही !
पवित्र शास्त्र आणखी म्हणतें की देवाने असा एक दिवस
नेमस्त केला आहे कीं त्या दिवशी आपण ठरविलेल्या मनुष्याच्या
द्वारे तो जगाचा न्यायनिवाडा नितिमत्वाने करील
तोंड प्रेतासारखं पांढरं फटफटीत पडलं तरी मुक्ति नाही...
कारणच एक आहे. पापामुळे जिणें देवाच्या गौरवासाठी झालें नाही...
पापाची मजुरी मरण ! एक शास्त्र म्हणते म्हणून
तो स्वर्गातून आला कारण पापाची शिक्षा अनुभवली म्हणून
तो पुन्हा वधस्तंभावर चढला...मेला. .पुरला गेला...
त्याचा पापदंड पूर्णपणाने मारला, आश्चर्यच !
तो पुन्हा तीन दिवसानी जिवंत होऊन उठला.
त्याने माझी पापें त्या खांबावर वाहिली.
त्याने माझी करुणाग्रकें क्रूसावर अडकविली
नि माझा जीव मरणापासून. डोळे अश्रूंपासून वाचविले !
वाटा असावा असे अगत्य नाहीं...
मोठा मानमरातब असावा हें योग्यही नाही...

# लाटा

दोन्ही डोळ्यांत रोजचेंच पाणी आलें
आकाश जवळ आलें
शांत बहरलेली रात्र
नि.....
प्राक्तनाचे धागे पुन्हां फुलत राहिले
नाही रे रहावत तुझ्याविना
झुरणी लागली.....
दर्यासारंगा
संथ लाटा उसळल्या
नि.....
थांबल्या आहेत मला नेण्यासाठी वाहताना

शाळेंत रोज जाताना
मज विघ्नें येती नाना
रस्ते दुतर्फा दिसती
आंघोळी करती ललना

# गाडी सुटेपर्यंत

पत्रावर पत्रें पाठविलीस
पण त्याची उत्तरें नाही पाठविली
दोर खूप ताणला..अगदी तुटेंपर्यंत
पत्रें नाही पाठविली
तुझी गाडी सुटेपर्यंत

# लगाम

टिपूर चांदणं
सत्तूच्या पिठाचा वास...
दूरवरची साद
माळमाळणीची
उभ्या उरोजानी
लवून केली सलाम
बागवाना येऊन घे
हाती लगाम
उफाड्याचा उधाण
कोणी आल्यागेल्याचा भास...
घामेजून गेली चोळी
पाहून ओशाळली मोळी
पण सलज्ज झाली कळी
अधरांची घाई गर्दी
कातरलेल्या चारीचं
पुन्हा मरण
केवढं ओझं
सुरू झाला प्रीतीचा सन्मान
आता पर्वा नसे खास...

मी गातो माझी गाणी
डोळ्यात तुझ्या ग पाणी !
डोळ्यात गोंदवुनि धुंदी
हे सूर तुझ्यास्तव राणी
स्वप्नांचे पक्षी तरती
स्मरणांना येई भरती
स्वप्नात कशी मनधरणी
डोळ्यांत तुझ्या ग पाणी

# पानचंची

पायलीभर करड
भरडून जा धिरटीवर
तांब्याभर पाणी
ठेवुन जा ओटीवर
काहींबाही बोलत राही
जें धुंद स्वप्नील हांसरे
सोडताना पानचंची
दृष्टी माझी भिरभिरे

ती : मनकवडी मी सख्या साजणा
बोलुं कशीं मी तुजजवळी
बोलत होते मनचे काही
फाजील कमळी हळहळली

तो : मनकवडा मी सखे साजणी
सांगूं कसा मी तुजजवळी
बोलत होतो तसेंच काही
" ऐक जरा तू ये जवळी "

## तुझा देव्हारा

पाही मी देव्हारा
तुझा सहारा...
तुला विश्व प्यारा पांडुरंगे

तुझें रूप..
तुझें गुण
तुझा गे आसरा ज्ञानगंगे

तू मूर्तिमंत
रुपांत अनंत
जगाचा पसारा मनगंगे

टाळ मृदंग
मनांत मी दंग
रूप मला देई पाषाण गे

सर्वांना तारीशी
पाण्यांत राहुनी
प्रेम प्रेम पाही चंद्रभागे

किती शब्द शोधूं ?
किती श्वास रोधूं ?
तूंच विश्वसखा पांडुरंगा

## कृष्ण कळा

अनंत अंबर
निरंतर राही
चिरंतन पाही
रूप सावळें...

अथांग सागर
अंबरास पाही
तैसें रूप पाही
भाव माझा

चंद्रमोहिनी तू
सूर्या पिसे लागे
वियोग बा नावडे
कोणालाही

पावन पावरी
धावोनिया राधा पाही
होऊनी बावरी
कृष्णकळा

मीरा मीरे भोळी
आले तुझ्या संगे
विषकन्या झाले
तुझ्यासाठी

शर उरीं लागे
तुझ्या रे प्रीतीचा
शरबाण चाले
नको रे बासुरी...

# चित्तचोर

वैफल्याने दग्ध होई मनाचा कंगोरा
कानोसा मग मिळे माझिया चित्तचोरा
उदास भावांनी गाईलें गीत वैराग्याचें
रंगल्या मैफलीत भाव ठाकलें शब्दांचे
धुंद वारा वाहे तेव्हां रात्र थांबून पाहे
मुक्या कळ्या उमलती ऋतुराज भार वाहे
रानातून रानाकडे शीळ गेली चोहीकडे
विसरून तुला मी रे सांग जाऊ कुणाकडे ?

## वाटतं व्हावं

शब्दांचाच रथ करावासा वाटतो मला...
तेव्हांच वाटतं शरीराचं विमान करावं
पायाची सायकल जशी करतों
तशीच वाटते कविता करावी
कधी कधी वाटतं...माझ्या प्रियेच्या
गळ्यात हात घालून रात्रीच्या रात्री
रामगिरीवरील यक्षाप्रमाणे कुबेराला विसरावं
आणि जावं विरहाच्या खाईत...
प्रतीक्षा करीत रहावी
आषाढातल्या मेघाची...
कधी वाटतं लिहावं काव्य कालिदासासारखं
किंवा रचावं नाटक
शेक्सपिअरच्या तोडीचं
वाटतं व्हावं
कधी चारुदत्त
कधी धैर्यधर
तर कधी चंदू डेग्वेकर...

## ओलीचिंब माझी प्रीत—

निळ्या निळ्या गगनांत
निळी चांदणी पहावी
हास्य रेखिव तिचें
हळू हळूच लाजावी
पहावी दुरून
रंग रंगोटी नभाची
पल्लेदार शोभा
कुसुंबी गालाची
निळी निळी चांदणी
डोळे मिचकावते
खळी पडे गालावरी
स्मित स्मितात हांसते
प्रीतीचाही पूर
प्रीतीचाही पाट
घेऊन ओला शेव
अडखळे चंद्र वाट
निळें गगन निळीही चांदणी
निळ्या रेषा निळाईत
निळा रंग निळें पाणी
ओला शेला पांघरीत
निरखिते माझे हित
ओल्या पावसांत उभी
ओलीचिंब माझी प्रीत

## अबलख वारु

दिव्यावर लाव दिवा
हातांनाही हात
सांद्र वातीत कापूर
लाव पाजळून वात

अबलख वारु
उगा नको त्यास मारु
सांज होतानाही येई
नको जिवास कातरू

दिव्यावर लाव दिवा
हातांनाही हात
कुठे लपलास ते
सांग येऊन कानांत

## सबले ( स्वतंत्रते ! )

तू आलीस नि वाटलं माझं दुःख सारं संपलं
उदास मनानं किती रात्री तळमळून काढल्या
सुकलेल्या सालासारखी माझी पाठ आणि पोट
प्रथम पाहिली असतीस तर ओळख पण
पटली नसती तुला : माझं पोट कुठचं आणि
पाठ ही काय चीज आहे ती :
वाटलं तू आलीस तुझं स्वागत करावं उक्षीच्या फुलांनी आपलं
यांचे आणि माझे दिवस सुधारतील
असं वाटलं होतं : तापलेल्या दुतर्फा
मर्तिकासारख्या पडलेल्या नगरपालिकेच्या
मृतप्राय नळ्या : संसार थाटला होता ना आम्ही
मध्यानीच्या सूर्याचे पाठीवर चटके घेत
आणि पुढे येणाऱ्या भविष्याचे घुटके पीत
पण बदल झाला, कारण तिरंगा चढला वरवर
आणि वाटलं आपलं हे संपलं
शेवाळ पाठीपोटावर चढलेले : की चढवलेले ? (आम्ही)
ते काय ते तुझं तु ठरव : वाटलं होतं
आता वाऱ्याची दिशा बदलली : रस्त्याचा रंग पण बदलला
तसा आमचाही बदलून जाईल :
पण कसचं काय नि कसचं काय :
तोंडात बोट घालून चोखतोय अजून
निवळणाऱ्या पाण्याची वाट पहात
बदलणाऱ्या प्रारब्धाचे खोल पाण्यांत
पाय टाकून, आणि आशेचा गळ टाकून
पण सबला तू : तुलाच इथल्या दुःखाने आपलसं केलं
मग कसा म्हणूं मी तू आलीस नि माझं दुःख सारं संपलं !

## रात्र अशी कां झाली ?

रात्र अशी कां झाली
सांग ना अवेळीं ?
मिटलेल्या पापण्यांतुनी
भरले ना काजळी—

किणकिणती सालंकृत करी
कर यंत्रे पायखुणा
पदचिन्हें विसरुनिया
एक करू दो मना—

हलवू नका मजला हो—
रात्र पहा रंगली
“ रंगवू या रात्र गडे ”
मी फुलवेणी हुंगली—

दूर तुम्ही कां होता
विजनांच्या दूरदूर
रात्रीच्या रात्री उभी
वाहुनिया अश्रुपूर—

स्तिमित सखे बनूस नको
मी आता तुजजवळी
मिटलेल्या पापण्यांतुनी
जागवूया रात्र काळी

## पांखरात राहू पाहे

दोन्ही पापण्यांच्या कडा
अश्रू पाण्याने भरूं दे
जीव तृषार्त व्याकूळ
अश्रू अश्रूत न्हाऊं दे

गेल्या दिसांचें स्मरण
काजळल्या रात्री बारा
माझ्या जीवनगीताच्या
वाजू द्या हो सप्ततारा

पांखरें जीं होतीं माझीं
दूर गेली राना वना
जलकुंड राहे माझें
पापण्यांना फुटे पान्हा

मध्यरात्रीं दारीं माझ्या
कधी घुमे हो पारवा
पांखराचें गीत गाई
सुखे वसंत पहावा

अशा रिकाम्या घरात
माउली मी वाट पाहे
वावरोनी मन माझें
पांखरांत राहूं पाहे

## कालिंदी

चित्र तुझें रंगविलें
प्रणयरूप कालिंदी
बघतांना मी हंसलों
नजर तुझी नजरबंदी

नेत्ररूप भाव किती
अंतरंग आर्जवी
चढते अन् कुंचल्यात
ओठातील शांभवी

षोडश वर्षदशा
पाहुनिया फुलराणी
हसताना स्मित तुझें
चंद्र फेकी मधुगाणी

कलिका तू मम घरची
कवितेतील कैरविणी
घेऊनिया जवळी तुला
माळतोही फुलवेणी

तरणी तूं तूंच उषा
जणुं कुस्करीली मी चांदी
नांव तुझें ठेवियलें
बादशाही कालिंदी

कलिका तूं अंगणीं
जाईजुई पैंजणी
संध्येची तूंच नशा
शुक्राची चांदणी

ओढ माहेराची माझ्या मनातून जात नाही
कैक वर्षे झाली माया आईची सरत नाही
शुक्रतारा मावळला झुंजुमुंजु उगवतीला
एक पक्षी उडाला पल्याडच्या आभाळाला
जा रे जा पक्षीराजा माऊलीला सांग माझ्या
लेकीच्या ओटीत तुझ्या खेळतसे बाळराजा
कोण करील कौतुक किती सांगू रानवाऱ्या
धीर धरीन आई, आणीन चंद्राला हांसऱ्या
साद देते वासरू गोठ्यातून गोठ्याकडे
कशी येऊ तुझ्याकडे कोडे ना ग उलगडे

चांदण्या रात्री पानाआड लपलेल्या फुलांना
केवळ वासाच्या अनुरोधाने शोधून काढण्याची किमया
तूं मला शिकवलीस आणि तूंच फुलवेडी होऊन
बसलीस...
सारेच सूर कसे जुळले होते
सारेच दीप कसे मंदावले होते
साऱ्याच काचा दवबिंदूंनी कशा शहारल्या होत्या
पण तू ! उगाचच स्पर्शाला वेडावून
वाऱ्याला गात ठेवून
विवस्त्र पांखरांना चारी दिशांना पाठवून
मुका गंध कुरवाळीत राहिलीस
आणि माझं माझेपण मलाच देऊन
मोकळी झालीस—

कमळण होती मनांत माझ्या
अनुतापाने जखडुन घेई
चंद्र बांधुनि घरास नेई
कमळण होती मनांत माझ्या
धूसर वाहे कृष्णेचा तट
आवरुनि मग घेई किनारा
डफ् वाजे तालात तिच्या मग
लावणीच्या चाळांत पटापट्
वाहू लागले मुकाट पाणी
कमळण माझी म्हणते गाणी
कल्पतरूंच्या शिरकिरणांतून
दाखविते हातात निशाणी
संकेताने पहात राही
आशा भरुनी उगाच पाही
कमळण मजला नाही नाही
कमळण माझी जळांत राही—

# हिशोब

त्या काळ्याकुट्ट अंधारात
कितीतरी माणसं उभी होती
प्राक्तनाचा अर्थ लावत...
त्यांनी तिथं काय केलं
नि मी इथं काय केलं
ते त्यांना कळायचं नाही
हा एक न ठरलेला हिशोब
केशमुळासारखा प्रोग्रॅम..
बोंबलतायत उगाचच
किंचाळतायत टापरून जिभा..
सुरवंटाचं फुलपांखरू होत नाही
होतं फुलपाखराचा सुरवंट म्हणून
भँचो भोसडीच्याना
काय माहीत आहे
काय कशाचं होतं ते..
जन्म नी मरण एक समजतात
उद्या समजतील भोग नि भाग्यही एकच
कर्माची कहाणी... !

झुंजुमुंजूच्या झांजरसमयी वेड मला कां लावियले ?
तुझ्या मीलनी मी न आले मन कां बावरलें ?
भाग्यवती मी असे साझी मी माझ्या दरबारीं
नको परतुनी येऊस सजणा भरल्या संसारीं
पानावरती लिहिलें गाणें जें ओठावरती आलें
घनकांतारीं मनांत माझ्या तसे कधी ना लिहिले
ललाटरेषा अशाच असती दिसती आरस्पानी
वेडाच्या कैफात म्हणतसे " मधुवंतीची गाणी "
शपथ घेऊनी तुला सांगते अशक्य या तरी जन्मी
कलिका होउनी अधरी येईन पुढल्या अपुल्या जन्मी

नार माझी नव्या नवतीची
चंद्रा चवथीची
माझ्या प्रीतीची
नथीतून न्हाली
नार माझी नव्या नवलाची
हनु अणुकुची
प्रभा प्राचीची
खोपीतून आली
नार माझी शाम सावलीची
माझ्या गांवधाची
ओल्या तनुची
ओलीतुन आली
नार माझी नव्या नखऱ्याची
धाई पाण्याची
कृपा मल्हाराची
मंदिरी आली

## आठवण

कधी येतो दिस झाली सये घाई
कुहूचे कुंजन भरून गेली आंबराई
सौभाग्याचा साज
भोळया लाजऱ्या मूंडोळया
डहुडले मन
कडापापण्यांच्या ओल्या
सनईचे सूर
दाटे मनांत काहूर
अश्रूच्या फुलांनी
पूजिला योगेश्वर
रोधलेला श्वास
विंधणारा वारा
हुंदक्यात दाटलेला
माहेरचा लळा
हळदले अंग
रंग गुलाबाचा गाली
कुंकवाचे बिंब
काया हरकुन गेली
हिरव्या चुड्यात शोभे
मांगल्याचा साज
हळव्या मनांत होती
सुखावली लाज

## अजुनी रंगले ना....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८००६१ काव्य
२९११० ८।३।८३

येऊ नको येऊ नको
दूर सख्या होना
शब्दरंग ओठावर अजुनी रंगले ना—
सांजवेल लवली बघ
घडघडले घनकी मेघ
बावरूनी बघत तुला दार लाविले ना—
शब्दरंग ॥
समजुनी घे हंसव मनी
नको, सख्या जाऊ रानी
तूं दूर सख्या जाना पण धाड साऊलीना-
शब्दरंग ॥
किर किरती रातकिडे
फुलऊनिया स्वप्नवेडे
सांजरंगी चित्ररंगी हळूच सूर गाना
शब्दरंग ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रो. क्रं. १८८७८

दृष्ट नका लावू गडे तीट लावा या घडीला
घडीभर येऊन हा नंदलाल घडविला
रुप पहा बाळाचे कृष्ण जसा देवकीचा
देवकीचा कृष्ण हरि जीवलगतो गौवळ्यांचा
हातात घुंगरू कुरवाळुन हा डोलतो
दुमडुन हा पाय पहा ठेक्यांत कसा वाजवितो
नांव जरी मणीकांचन ठेवियले या घडीला
नांव खरे रमणहरि साक्ष असे झोक्यांला
थकले मी ओट्यांनी आवरा ग कुणीतरी
अवघडले कुसुमांनी फुलवेण्या घ्या तरी
पालखीचा पाळणा कुणी कसा ग बांधविला ?
रमणहरि घेऊ कसा हलणे ना वासुकीला
तांबू बघ हंबरते प्रीयराजा बघण्याला
तांबूचा बाळ कसा धावत ये खेळला
निंबूलिंबू उगळा ग वेळ नसे खेळेला
तिन्ही सांजा या झाल्या तीट लावा बाळाला

ये अशी एकदां आसावरी तू होऊनी
मंद मंद वात हा स्वैर सुटला रानांतुनी
मीतभाषी कर्णवेली स्वप्न रचिती कानांतुनी
गृहकाम काही राहिले तर करूनि ये परतुनी
ये अशी एकदां ॥

खोल रात्री अंधारल्या बावरुनी त्या साजणी
खोल दर्या धुंदावला रूप बघुनीं दर्पणी
प्रीत माझी आवडेना। कां आलीस तूं परतुनी-
ये अशी एकदां ॥

स्वप्न वेडें दो जिवांचें कातरले दोघांनीही
हास्यवेड दो जिवांचें अनमोल ठरलें प्राणाहुनी
दो प्रहरांची वेळ झाली स्वरपंख ये लावुनी
ये अशी एकदां ॥

रानचाफा माळून ये अधिर मी तुज हुंगण्या
शुक्रतारा होऊन ये साद देतो ती सांगण्या
रातराणी विसरली गंध अपुला तुज पाहुनी
ये अशी एकदां ॥

हासलीस तू उलट कुंकू लावलंस म्हणून
नाचलीस तू सरळ हासलीस म्हणून
गायिलीस तू नूपुर हालले म्हणून
लाजलीस तू पदर ढळला म्हणून
आंसवानी पापण्या भिजल्या
शेज कळली म्हणून—

आम्ही कविता करतो..
कविसम्मेलनं भरवतो
आमच्याच कविता आम्हीच वाचतो
नि ऐकतो...
वाहव्वा...वाहव्वा...आम्हीच
प्रोत्साहनाचे बाण मारतो..
आम्ही काय अकलेचे तारे तोडलेयत्
ते मग जिभल्या चाटत; रविवारच्या
एकजात पेपरांच्या पुरवण्या वाचतो
कितीही केलं तरी...
संपादक नांवाचा द्विपाद...आमच्या
कवितांची "व्हॅल्यू" ठरवतो..
संपादक कसला तो...! मला चित्रगुप्त वाटतो...
पापपुण्याची नोंद ठेवणारा...
आम्ही कसलं पापपुण्य करणार ?
पण याला माहित आहेत आमची पापं नि कुलंगडी
चोरीचा माल पुन्हा खपवायचा चोरून...
बाकी काय होणार आहे म्हणा आमच्या हाताने ! ...
आमचा आकाशस्थ 'चित्रगुप्त" घटकापळे मोजतो..
आणि अधरस्थ चित्रगुप्त पेपरवेटखालच्या नोटा मोजतो...

ओली आग...

त्या स्वप्नांत कर्कशपणे कसल्यातरी
घंटा वाजत होत्या आणि छापलेल्या अक्षरांचे
जळते शिक्के माझ्या अंगावर डागले जात होते
ते चाफ्याचं हिरवं झाड...आता ते तिथं नाही ..
राख झाली त्याची...पानन् पान पेटलं त्याचं...
हिरवा बुंधा चुलीतल्या जळक्या लाकडासारखा
दिसायला लागला...
निगेटिव्ह..रॉस्टॉक..माझं घर...
माझं स्वप्न ..सगळं सगळं जळून जात आहे
लक्षावधी रुपये जळून जाताहेत...कितीक दिवसांचे
श्रम...कष्ट..आशा...महत्त्वाकांक्षा...इथं माणसांची
आयुष्यच्या आयुष्य जळून खाक होत आहेत
फोन कॉल्स.. भेसूर घंटा वाजताहेत...ॲसिडची
बाटली..शरीर सारं घातक द्रव्यानं निथळत आहे
चेहरा बदलला ..डोळे बदलेले...शरीर होरपळलं ..
ओली आग जीवघातकी...हिरव्या झाडानं
एकाएकी पेट घेतला आहे...एकाएकी पेट घेतला आहे

## सत्य

सूर्यप्रकाशा एवढं सत्य
नुसतं भासविणारं नारळीच्या झावळासारखं चकवणारं
ओलेती बाळंतीण पुन्हा गर्भार रहावी तशीच पोफळीची
राई मनात भरून रहाते
झुळकांची चिरगुटं पाठीवर मारून धावणारा वारा कंबरड्यात
ठोसे घालतो...आणि माझं मलाच कळत नाही...मी...कीती-
वाट चालणार आहे... ???
ओठ सुकून खारका झाल्या
दाढा पडून चिकण मातीचे बुळबुळीत गुळगुळीत खड्डे पडले
प्रथम दाढीचे, डोकीवरचे केस पिकले नि गळले नि नंतर-
पाठीची धनुकली झाल्यावर मनगटावरचे केस वावटळीसारखे-
उडून गेले. .रहाता राहिला मी खरबुजी टरबुजी सांगाडा..बुजगावणं..
मन मनाशीच तक्रार करतं...आतडी कुजतात...स्मशानातल्या-
समंधे डॉक्टराकडे जाईपर्यंत . .ती पण मरतात कुजून घाण
सुटलेल्या घणसासारखी...
तिरवडीवर आँ करून रहातो ..माझ्या बेबंद धावणाऱ्या नसबंद
झालेल्या बेमुर्वतखोर शरीराचा अस्पृश्य सांगाडा...
सावळ्या गुरव या खांद्यावरून त्या खांद्यावर घालीत चिलटतो
" काय खात होता रे हा ? एवढा गद्‍डा कसा काय! मिठाच्या
फरीसारखा !
" च्यायला तुला काय करायचय ! "
" घाल व्हंडक्यात नी वड माती साल्यावर ! "

सागराची गाज
विळयेतनं कांतार
वाऱ्याचा सूर
चुडत्याच्या पात्यात
कातीच्या धारेवर
भिरभिरती नजर
तूं गिरेस्ताची चोळी
अंगातनं ओली
पापण्यांच्या पर्णांत
नजरेचे लुकलुकते काजवे
काचेची काल्स...
बादळी पोरे
बादळी वारे
सूर काढून सुरात सूर लाय
रेंदरा तू कवळ्यानं गाय

## मागायचं होतं

फार दिवस झालेयत् नाही !
तू भेटलीस, बोललीस
मनांतलं सारं सांगितलस..पण माझं मागायचं राहिलं होतं...
जे होतं अगम्य नि गूढ...
मी दुर्दैवी, नशिबातच नव्हतं...
तरी पण वाट पहातो...सारखा वाट पहातो...
हा श्रावण संपला की दुसऱ्या श्रावणापर्यंत...आषाढ...माघ...
ओल्या संध्याकाळी पांघरून..डोळ्यांत जीव आणून...
तुझ्या वाटेकडे उगाचच डोळे वळतात...कधी सूडाने पेटतात...
कधी माझी मलाच कीव येते...संध्याकाळच्या धूसर छायेत
मनातल्या मनांत पेटतो...
नि समुद्राच्या वाळूत पाय पसरून बसतो...
माझ्या घराच्या मागच्या बाजूला हिप्पी अलीकडे रोज येतात..
सूर्य मावळतो केंव्हा..आणि अंधार पडतो केंव्हा..
नि नंतर...कपड्यांचा सळसळाट...माडांच्या राईच्या
सळसळाटासारखा...मनोज्ञ...
मी मात्र तुझी वाट पहातो
कुळागारातल्या अंधारात....खोल कुठेतरी दूर...दूर...
नि...
उदास...रित्या मनाने माझ्या झोपडीत शिरतो....
दिवा मालवतो ..जेवढे पेग मारता येतील तेवढे मारतो...
नि...
पहाट होईपर्यंत आढ्याकडे डोळे लावून तुझ्या आठवणीत सारा
जीव ओततो...

# बासरी

थेंब गळून माठ झाला रिकामा
पण तेच त्याच माठातील पाणी
साचून खालचा खड्डा मात्र भरूनच राहिला..
सामान्य जीवनाशी हे जीवन झिरपत रहातं..
आणि एखाद्या सायंकाळी आर्तपणे गाणाऱ्या
पाखराशी सलोखा करून गोड गळ्यानं
गाऊ लागतं ते गीत.. सांद्रसंगीत
मग होतो जलौघ
रम्य सायंकाळ
आणि त्या दूर क्षितिजात अदृश्य होणारी
रानपोराची गोड गाणारी बासरी . . .

## स्मशानयात्रा

स्मशानयात्रा पण आहे, एक महायात्रेसारखी...
फरक एवढाच, महायात्रा देवा शिवाच्या मंदिरात
होणारी...पालखी अंबारीतून शाही इतमामात
जाणारी ...नि स्मशानयात्रा जाते ओसरीओसरीनं...
खांद्यावर तिरडी घेऊन....कुणी सामोरे येण्याचं-
धाडस करीत नाही...महायात्रेच्या मात्र सामोरे
येणारे खूप...स्मशानयात्रा सुरू झाली कीं
हरिराम जयराम चा 'जयघोष' रानवट फुलांचा दर्प
नि शेणामेणबत्त्यांचा नकोसा वाटणारा वास...
पण जायचंच आहे ना कधी तरी ? मग अनिच्छेने कां ?
स्वखुषीने कां नाही ? अजूनही घिसाडी मन वावरतं
छानछबेलींच्या गुलाबी गालांच्या कंगोऱ्यावरून ?
दगड उचलायचा कनवटीला लावायचा...इरागतीला बसून
पाय धरून खड्डा खणायचा नि गाडून टाकायचं
की मग संपली स्मशानयात्रा...काव्या
कावळ्यांनी पिंड पळवले कीं संपला उरलेला कार्यभाग
पण महायात्रा मात्र सदाचीच ! ती संपत नाही.
संपविण्याची कुणाची प्राज्ञा नाही...
अस्तित्व संपविण्याचा माणसानं प्रयत्नच केला तर
स्वार्थांध देव त्यांची स्मशानयात्रा काढल्याशिवाय
राहाणार नाही...

## तू एक ज्योत एक समई

एकाच वेळी पाऊस पडतो
थंडगार वारा...थंड झरे...थंड जमीन...
थंड थंड कमलिनीची संथ गतीनं
हालणारी हिरवीगार पानं...
सारंच हिरवं
मला पण वाटतं पावसाशी समरस व्हावं...
आणि कुठुन तरी आर्तपणे साद द्यावी...
तू पण आणि तुला पण
वाटत असेल नाही कां ग ?
वाऱ्यापावसासारखं थंडगार व्हावं
"चल वेडे असं काहीतरी अचाट बोलू नकोस
प्रश्नही माझे उत्तरंही माझीच...
पाऊस आला की मला वाटतं
जाई आणि जुई...
शेवंती आणि दूधमोगरा...
अष्टर आणि धोत्रा...
पण फुलतील...
त्या शंकराच्या देवळाच्या मागे
तू मला प्रथम भेटली होतीस तिथं...
नाही आठवत ? मला सारं आठवतं
तुझा तो घाबरून गेलेला लालबुंद चेहरा
आणि तुझे बोलके डोळे...
किती गोरी ग तू, जणू टॉमेटोलाच डोळे फुटलेयत...
आवडतेस मला तू...
तू माझ्या हृदयाच्या सांदीकोपऱ्यातली ज्योत आहेस...
सदा तेवणारी समई आहेस..

थांबला हो चंद्र राया
नको नको करूं खंत
साजणा रात गातसे प्रीत ॥

अंतर फुललें तुम्हा पाहुनी
मनांत कांही तसे गुंफुनी
मेंदी नखावर साज तनूवर
गजरा कच पाशात
साजणा रात गातसे प्रीत ॥

हळवी मी हो तव नवकांता
दूर दुरावा नकोच आता
लटका रुसवा स्वप्न गोजिरे
लपवुं कसें पदरात
साजणा रात गातसे प्रीत ॥

चंद्र कलला पहा परतुनी
हसले गाली अधीर होउनी
वेडी प्रीती खुळी बावरी
येऊन घ्या पदरात
साजणा रात गातसे प्रीत ॥

## घुमटी

पुढचा पवित्रा टाकला आणि कळलं
जीवन कसं मिथ्या...भकास...
कृष होत चाललेल्या अधाशी भिकाऱ्यासारखं
काय करायचं जगून या जीवनात ?
फोल ठरलेल्या आशा जोडायच्या...?
प्रपंचात येणारा संग्राम लढवायचा...?
आणि संबंधितांच्या संबंधाचे जोडलेले
धागेदोरे पिचवायचे...? कां, कशाला पण हे ?
स्वार्थाच्या तारा कशास म्हणून खाजवायच्या ?
पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी ?
अक्कल नसलेल्या बोकडाप्रमाणे उड्या मारणाऱ्या—
समाजात प्रतिष्ठा हवी म्हणून ? थत्...थू..
एकलव्याला समाजानं काय स्थान दिलं ?
तेजःपुंज बाबांना तरी ?
आफ्रिकेतल्या निग्रोंना ?
सावरीचे काटे आहेत काटे ! बोचून न बोचल्याचा बहाणा करणारे...
नशिबाची वळकटी गुंडाळावी...
आणि घालावी सिमेट्रीच्या वैतागून, तापून पडलेल्या मैदानात
चिरनिद्रा घेण्यासाठी...
आणि प्रतिष्ठेच्या घुमटीत शिरून पापी तोंड लपविणाऱ्या—
मुसलमानणीच्या तुकतुकीत मांड्यांची अभिलाषा करणाऱ्या—
दिलरुब्यापासून दूर होण्यासाठी...

ोली शाल पांघरून संध्याकाळ येते...
ाणि हळूहळू काळसर धुवट रंग चौफेर विखरून द्यावा तसा अंधार पण
पसरू लागतो...तुझ्या वाटेकडे माझे डोळे लागलेलेच असतात...
तूं तांबड मातीतून डोकीवरचा भारा सावरीत...सावरीत...येशील...
धपकन तुझ्या डोकीवरचा भारा परसावात पडेल
आणि धाव घेशील माझ्याकडे...
आकाशात उंच उडणाऱ्या घारीसारखी तुझी
भरारी एवढी गतिमान असेल कीं माझ्या
हातातला तुझा 'गोविंद' हिसकावून घेईपर्यंत
तुझी गती थांबलेली नसेल..थोडी सलज्ज
होऊनी तूं एक डोळा मिचकावून एका बाजूची
चोळी वर करशील, आणि मी पण चोरून...शरमून
पाहीन तुझ्याकडे...तुझ्या डोकीवरची उक्षीची फुलं..
चौवीस तासांच्या श्रमाचे अष्टकोनी षटकोनी रंग...तुझे कष्ट
तुझी व्यथा...तुझ्या डोळयातलं पाणी..मी न्याहाळत राहीन...
शरमून...लाजेनं..अभिमानानं !! कारण तू ..

## वाजीव एकतारी

कां गुंगुनी मनीं तू स्वप्नांत अर्थ लिहिशी ?
कां गुंतुनी विलोल नयनीं आणून रंग भरीशी ?
भरलेस रंग जरी तूं आकाश संथ लहरी
लिहिलास अर्थ तर तो अनुराग घे भरारी

कां खंत करशी मम लाडक्या फुला रे ?
कां रात्र जागवीशी मी कैक योजनें रे
फुलवी फुलांत प्रीत भ्रमरांस कळुं दे कहाणी
रात्रीत रात्र जागू संपू दे अपुली विराणी

कां सांडिशी कळ्यांचे हळवे गुलाब थेंब ?
कां लाविशी मुखीं तू फसवे शशांक बिंब ?
गाऊन रागदारी बघ आणिल्या सतारी
सम साधुनी तुझी तूं वाजीव एकतारी

## किटाळ

कृष्णेचा रुंद आणि मोकळा मोकळा डोह...

दूरवर पसरलेलं तारळ खोरं...भयानक रात्रीशी सदाचीच मैत्री...

दोस्ती करणारे मातंग...मांग...रामोशी...

उभा जन्म बामनाना सांभाळलं...

वारे आले, पाऊस संपून पुन्हा आला...

अफाट स्वामिभक्ति . .

मातंगाना बामनानी कसलं जीणं दिलं...?

लुत लागलेल्या कुत्र्याचं...!!!

मातंग काळोख पिऊन जगत असत...

'ढानी'...मांग जातीचा...रानवारा पिऊन सुखावतो...

खंडोबाच्या देवळातून घंटी चोरून नेणाऱ्या घंटी चोराना अंगठ्याखाली

ठेचून चोळा मोळा करतो. .केवढं खंडोबावर प्रेम...आपले पण...

प्रतिवर्षि होणाऱ्या यात्रेत एकदांच पालखीला येऊन हात लावायचा...

नमन करायचा बिचारा ढानी मांग. .

हात तुटला असता पुन्हा स्पर्श केला असतातर. .

(काय अपराध होता तुझा ढानी?) मानव नांवाचा एक गरीब प्राणी...

समाजानं लोहाराच्या आगट्यात घातलेला...

ढानी डगरीडगरीतून फिरताना लांडगासुद्धा डहाण्या वाघ आला—

समजून जागच्या जागी रिचायला हवा...कधी कधी खीनभर तमाकू

मळताना ढानी दिसे...दूरवर पहात...
पिंजारलेल्या मिशा ..खून चढलेले डोळे...
ढानी मांग सुटा झालेला जणू पाषाणच...!!
केकताड कापावे...मुसलमानाला विकावे.. बापजाद्यांचा धंदा सांभाळावा
इमानेइतबारे...ढानी स्वाभिमानाचा वेडा पीर...एखादा तालेवार
बामन घालतो हुलीवर आणि ढानी एखाद्याला खापून काढतो...
बामन संकटाची घोरपड आली म्हणजे
पालीसारखा टिचकीसरशी उडवतो.
आणि ढानीचे रानावनात कष्टाने दिवस जातात... ज्याचा त्यालाच
सुवर्णाचा कंठा मिळतो.. ज्याचा त्यालाच जरतारी पागोटा रहातो...
सरकारी माणसांचा ढानीच्या मागून ससेमिरा चालूच रहातो...नि
एखाद्या दिवशी मणभर ओझ्याच्या बेड्या घेऊन जन्मठेप...
पण चंद्री ? सागरासारखी प्रीती करणारी सखी...तोंडात माती...
घालून घेते..दोन्ही हात दंडापासून गोंदवून हिरवेगार चारीसारखे
केलेले असतात त्यात ढानीची फरशी पण...ढानी इमानी
असून समाज स्वार्थासाठी त्याला गर्तेत टाकतो..त्याची-
स्वामिभक्ती गेली मातीत...राख झाली..शेवटपर्यंत त्याला
साथ देते त्याची चंद्री किटाळ आलं तरी...त्याच्या...
जिवाभावाच्या मैत्रीसाठी साता समुद्रावर...काळ्यापाण्यावर जायला
तयार असते... कारण तिने पाटाची असून ढानी मातंगावर
खरं प्रेम केलेलं असतं... खरं प्रेम केलेलं असतं..

# घ्या लावून दारं

पापाची पापदरी आता थांबवा
कारण वाजू लागलेयत सूर्यरश्मीबरोबर धावून येण.रे डंके...
असंख्य नागांची असंख्य वारुळं तुम्हीच तुमच्या हातांनी
बंद केलीयत...परब्रम्ह समजून प्रकाशाची भाषा बोलत
गेलात पण अंधार कुठे गुडुप झालाय याची कधी कुणाजवळ
वाच्यताच केली नसेल .
अरे तेजस्वितांनो ! नजराणे अंगावरचे उतरवून ठेवा
ताटात ठेवा दुष्यंत राजाचा राजमुकुट–
आणि लावून घ्या उघडलेली सताड दारं
विश्वाचा जन्म केंव्हा झाला
समृद्ध संसार केंव्हा बाजार बसवेझाले
अरे काळजाच्या घडालाच हात घातलात तुम्ही आमच्या !
गतीस्पष्ट याचना करतोय रे...
पापाची पापदरी आता थांबवा !
ओल्ड स्पाइसचा वास
आता संपलाय तुमच्यासाठी
कारण मी व माझे किंकर्तव्यमूढ होते ते
तारे मोजून आजच खाली उतरलो आहोत –
देवाची दानवदिशा कुठे धावतेय त्याचा मुग्ध करणारा आवाज
पण समजलाय –
पतनबिंदू परावर्तनातून खूपसला गेला
म्हणून म्हणतो लावून घ्या उघडलेली सताड दारं

आहे मनांत माझ्या तुझिया घरास यावे
निमिषात प्रश्न पुसुनि शंकीत तुज करावे
ग्रीष्म माझ्या दारी कां हिंडतो सदाचा ?
शरदात चांदणें जें तें लोपले म्हणुनी कां ?
आयुष्य भोग मोठा ऐश्वर्य सुख खोटे
तुझिया विना प्रभो रे ! हे विश्व भास वाटे !

REFBK-0018847
REFBK-0018847

गाणें गाईलास
माझ्या प्रिया !
थांबूनी ऐकले तू
माझे गीत
हातालागी हात
प्रेमाने सांभाळी
दूर सवे ने तूं
प्राणप्रिया !



| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २२ | ८ | तुझंयत | तुलाच |
| ५० | १ | धाई | घाई |
| ५० | २ | कुंजन | कुजन |

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ९८८६

## आगामी

ले. पंढरीनाथ रेडकर

- पौर्णिमेचा चंद्र ( कादंबरी )
- आसवांचा हार दे ! ( नाटक )
- अश्रूंचा अभिषेक ( कथासंग्रह )

* कांही वाचनीय पुस्तके *

## प्रकाशित

- जटायु आणि हकिगत ( कादंबरी )

  ले. प्रा. केशव मेश्राम

  [ पी. पी. एच. बुक स्टॉल प्रकाशन मुंबई ४ ]

- बेनवाड ( कथासंग्रह )

  ले. वामन होवाळ

  ( अभिनव प्रकाशन मुंबई )



दूरवर कुठतरी उगाचच भरकटत जातोस, वेळाकाळाचं बंधन विसरून शक्यतो पायानीच वाट तुडवत । सागराच्या प्रचंड लाटा, गलबतामागून पिरंगत जाणारे गलपक्षी, मुशीतून धावणारं गतीमय पाणी, थंडगार झरे, झुळझुळ वहाणारी मत्त हवा, विशाल पर्वतराजी, नयनरम्य अंतराळांत पसरलेले अभावित रंग, सोनेरी काठाची धोतरं नेसलेली – ब्राम्हण पंडिता सारखी मेघमाला आणि लालबुंद शाम ।

तुझा जीवनरथ या साऱ्या संम्मोहनातून सुंसाट सोडतोस, कधी पर्णकुटी
रच्या सुतारपक्ष्याचं ठोक ठोक ठोक असं गाणं तुला ओढून नेतं, तर कधीं
वमंदिरातील नंदादीपातील तेल कमी कमी होऊन वात मंदावते कां याची
ती – तुझ्या मनाला उगाचच चाटून जाते. भावनानी भावनाट्य जे उभारलय्
तला तू एक विदूषक । प्रसन्न हांसशील । उगाचच टाळयावर टाळ्या वाजवून
नोभनीयतेत भर घालून कमनीय लावण्याचा परिपोष जिथे होतो, जिथे
तीची खरी साद दिली जाते, त्यावरची मधुर गाणी गाशील. मानवतेचे लालबुंद
रे आणि भकास विचारात चक्रावून जातोस । नखरेलपणा करून
कलेले पदन्यास तुला आवडतात आणि तुझं भांबावलेलं मन त्या बरसणाऱ्या
न्यासात स्वतःला विसळून घेतं आणि त्याबरोबर तुझ्या विचारांची महिरप
ढत वाढत जाते अगदी समाज बंधनात जळत असलेल्या मानवतेच्या दुःखा
ंत...अरे तू खरा स्वप्नांचा सौदागर सजवशील शामियानें शितल चांदण्या-
त्री आणि वळेसर विणशील निशिगंधाचे मधुबनात बसून.. तुझ्या स्वप्नातल्या
णीसाठी...तूं धुंद होशील पण कालस्वर तुझ्या कानावर सारखा आदळेल
ाणि सांगेल "कुसुंबी शालूत ओला पाचोळा गुंडाळलाय् सारा. ."